RNI No. MAHBIL /2009/29236

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग एक-मध्य उप-विभाग

वर्ष १२, अंक ३७] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर १०-१६, २०२६/भाद्रपद १९-२५, शके १९४८ [पृष्ठे ५६, किंमत : रुपये १६.००

प्राधिकृत प्रकाशन

शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी

विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १४ ऑगस्ट, २०२६.

अधिसूचना

क्र. एजीपी-२०२४/प्र.क्र. ०३/का-१४.—विधि व न्याय विभाग शासन अधिसूचना समक्रमांक दिनांक १ एप्रिल २०२६ अन्वये मा. मुंबई उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई येथे २२ अधिवक्त्यांची "सहायक सरकारी वकील" पदावर दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ पुढील एक वर्षाचा कालावधी अथवा त्यांच्या वयास ६२ वर्षे पूर्ण होत असल्याच्या दिनांकापर्यंतचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरुपात मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच, उपरोक्त शासन अधिसूचनेद्वारे ॲड. कृपलानी लविना चतुर या अधिवक्त्याची "सहायक सरकारी वकील" पदावर दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ पासून पुढील सहा महिन्यांच्या कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरुपात मुदतवाढ देण्यात आली होती.

२. त्यापैकी ॲड. कृपलानी लविना चतुर या अधिवक्त्याच्या नियुक्तीस "सहायक सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता" पदावर दिनांक ९ ऑगस्ट २०२६ पासून पुढील तीन महिन्याचा कालावधी अथवा त्यांच्या वयास ६२ वर्षे पूर्ण होत असल्याच्या दिनांकापर्यंतचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरुपात मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. सदर मुदतवाढ महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवाशर्ती व मानधन) नियम, १९८४ यामध्ये दिलेल्या सेवाशर्तीच्या अधीन राहील.

४. वरील आदेश मागे घेण्याचा/त्यात दुरुस्ती करण्याचा/ते रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

राजेश स. मांजरेकर,
कार्यासन अधिकारी.

विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १४ ऑगस्ट, २०२६.

अधिसूचना

क्र. एजीपी-२०२४/प्र.क्र. ०४/का-१४.—विधि व न्याय विभाग शासन अधिसूचना समक्रमांक दिनांक १० एप्रिल २०२६ अन्वये मा. मुंबई उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई येथे ३८ अधिवक्त्यांची "सहायक सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता" पदावर दिनांक ९ फेब्रुवारी २०२६, व ४ अधिवक्त्यांची दिनाक ५ मार्च २०२६ पासून पुढील एक वर्षाचा कालावधी अथवा त्यांच्या वयास ६२ वर्षे पूर्ण होत असल्याच्या दिनांकापर्यंतचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरूपात मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच, उपरोक्त शासन अधिसूचनेद्वारे १० अधिवक्त्याची "सहायक सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता" पदावर दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ पासून पुढील सहा महिन्यांच्या कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरूपात मुदतवाढ देण्यात आली होती.

२. त्यापैकी पुढील १० अधिवक्त्यांच्या नियुक्तीस "सहायक सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता" पदावर दिनांक ९ ऑगस्ट २०२६ पासून पुढील तीन महिन्याचा कालावधी अथवा त्यांच्या वयास ६२ वर्षे पूर्ण होत असल्याच्या दिनांकापर्यंतचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरूपात मुदतवाढ देण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिवक्त्यांचे नाव	अ.क्र.	अधिवक्त्यांचे नाव
१.	ॲड. घाग शैलेश सुरेश	६.	ॲड. तेंडुलकर रश्मी सुरेशचंद्र
२.	ॲड. होळंबे-पाटील बापू विठ्ठलराव	७.	ॲड. कृष्णाय्यर धनलक्ष्मी शंकरनारायणन
३.	ॲड. करमकर सुकांता अनिल	८.	ॲड. न्यूटन राजेश्री वसंत (काकयनवार राजेश्री सदाशिव)
४.	ॲड. कुलकर्णी बलराज बाळकृष्ण (दिनांक २९ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या आदेशान्वये) ॲड. कुलकर्णी बलराज कृष्णा	९.	ॲड. तल्हार शिल्पा गजाननराव
५.	ॲड. हुमणे रंजना दिनेश	१०.	ॲड. गोताड अनुजा सुनील

३. सदर मुदतवाढ महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवाशर्ती व मानधन) नियम, १९८४ यामध्ये दिलेल्या सेवाशर्तीच्या अधीन राहील.

४. वरील आदेश मागे घेण्याचा/त्यात दुरुस्ती करण्याचा/ते रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

राजेश स. मांजरेकर,
कार्यासन अधिकारी.

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 22nd July, 2026.

NOTIFICATION

No. SPP. 2026/C.R. 103/D-XIV—In continuation of Notification No. SPP-2020/C.R. 37/D-XIV, dated 4th March, 2020, in exercise of the powers conferred under section 32(1) of the Protection of Children from Sexual Offences Act (POCSO), 2012 (No. 32 of 2012), the Government of Maharashtra hereby designates All Public Prosecutors/Additional Public Persecutors (Having a minimum of 7 Year's Experience) at Sessions Court in concerned Districts in Maharashtra, as Exclusive Special Public Prosecutors to conduct cases before the Exclusive Special POCSO Courts (Fast Track Special Courts) constituted under Government Resolution No. FTC1419/5/C.R. No. 04/Desk 09, dated the 4th March 2020 of Law and Judiciary Department and orders dated the 25th July 2019 and 8th January 2020 passed by the Hon'ble Supreme Court of India in *Suo-Moto* Write Petition (Criminal) No. 01/2019.

2. Above Public Prosecutors/Additional Public Prosecutor are hereby designated as Exclusive Special Public Prosecutors with effect from the date of this notification, in addition to Special Public Prosecutors already appointed *vide* different Notification.

3. Above designations as Exclusive Special Public Prosecutors shall remain in force until further orders and also co-terminus with their appointment as Public Prosecutors/Additional Public Prosecutors.

4. Above Public Prosecutors/Additional Public Prosecutors are designated as above strictly subject to the conditions of service laid down in the Maharashtra Law Officers (Appointment, Conditions of Service and Remuneration) Rules, 1984.

5. The Government reserves the right to revoke/modify/annul the order without assigning any reasons.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. KUNWARSINGH R. SINGHEL,
Deputy Legal Advisor-*cum*-Deputy Secretary.

लघुवाद न्यायालय, मुंबई

अधिसूचना

क्रमांक -१००३/२०२६.—महाराष्ट्र राज्यातील दुय्यम न्यायालयातील कार्यरत लघुलेखक ग्रेड-१ यांना राजपत्रित वर्ग-२ चा दर्जा लागू असल्याबाबतचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.९०/का.६, दिनांक २६ जुलै २०२४ ची प्रत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र. ब (जन)-१००१/२०२४/१४०४, दिनांक ६ ऑगस्ट २०२४ अन्वये या कार्यालयास कळविले आहे.

त्याअनुषंगाने लघुवाद न्यायालय, मुंबई या न्यायालयातील "लघुलेखक ग्रेड-१" यांना राजपत्रित वर्ग-२ चा दर्जा लागू असल्याबाबतची अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध करणेकामी या न्यायालयातील खालील "लघुलेखक ग्रेड-१" यांची नावे अधिसूचित करण्यात येत आहे.

अ.क्र.	कर्मचाऱ्यांचे नाव	पदनाम
१.	श्रीमती भारती प्रशांत खराडे	लघुलेखक ग्रेड-१
२.	श्रीमती वर्षा चेतन वानखडे	लघुलेखक ग्रेड-१
३.	श्रीमती स्मिता जॉर्ज मुर्झेल्लो	लघुलेखक ग्रेड-१
४.	श्रीमती शितल मंगेश मोरे	लघुलेखक ग्रेड-१
५.	श्री. उपेंद्र गुलाबसिंग चौधरी	लघुलेखक ग्रेड-१
६.	श्रीमती रीतू अमर दत्ता	लघुलेखक ग्रेड-१

लघुवाद न्यायालय, मुंबई,
दिनांक ३१ ऑगस्ट, २०२६.

निलम शाहिर,
प्रबंधक.

विभागीय आयुक्त, नाशिक यांचे कार्यालय

नवीन प्रशासकीय इमारत, नाशिक रोड, नाशिक ४२२ १०१.

अधिसूचना

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक-एसआयए/सीआर-७८/२०२६ - **ज्याअर्थी,** भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे), महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम १० क मध्ये, अशी तरतुद केलेली आहे की, राज्य शासनास, लोकहितास्तव, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, उक्त कलम १० क मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही प्रकल्पांना, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन आणि तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देता येईल ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील स्थायी आदेश क्रमांक एसआए-२०२३/प्र.क्र.१०५/अ-२, दिनांक १७.११.२०२५ नुसार उक्त अधिनियमाच्या कलम १०-क अन्वये प्रकरण दोन व तीन च्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्याचे शासनाचे अधिकार विभागीय आयुक्त यांना प्रत्यायोजित करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये नमूद केलेल्या जमिनींची उक्त कलम १० क च्या खंड (च) च्या व्याप्तीत येणाऱ्या आणि यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये नमूद केलेल्या प्रकल्पासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश – "उक्त प्रकल्प" असा करण्यात आला आहे) आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे विभागीय आयुक्त, नाशिक यांस दिसून आले आहे ;

आणि ज्याअर्थी, विभागीय आयुक्त, नाशिक याने उक्त प्रकल्पांकरिता केवळ निव्वळ जमिनीची आवश्यकता भासेल हे लक्षात घेऊन, प्रस्तावित संपादनासाठी उक्त जमिनींचे व्याप्तीक्षेत्र सुनिश्चित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, विभागीय आयुक्तास याद्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम १० क खालील उक्त प्रकल्पास उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व प्रकरण तीनच्या तरतुदी लागू करण्यापासून लोकहितास्तव सूट देणे, इष्ट वाटते ;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम १० क आणि राज्य शासनाचे स्थायी आदेश क्रमांक एसआए-२०२३/प्र.क्र.१०५/अ-२ दिनांक १७.११.२०२५ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, विभागीय आयुक्त, नाशिक याव्दारे, उक्त प्रकल्पास लोकहितास्तव, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोनच्या आणि तीनच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देत आहे.

अनुसूची - एक

जमिनींचा तपशील

गाव – त्र्यंबकेश्वर, तालुका - त्र्यंबकेश्वर, जिल्हा - नाशिक

अनुक्रमांक	भुमापन किंवा गट क्रमांक	आवश्यक जमिनीचे अंदाजित क्षेत्र (हे.आर.)
१	३६३/अ/१	०.१७.४१
	एकूण क्षेत्र ...	**०.१७.४१**

अनुसूची - दोन

प्रकल्पाचे वर्णन

प्रकल्पाचा उद्देश	सिंहस्थ कुंभमेळा दरम्यान गोदावरी नदीमध्ये भाविकांच्या स्नानासाठी पुरेसे पाणी उपलब्ध राहण्यासाठी उपाययोजना.
प्रकल्पाचे नाव	सिंहस्थ कुंभमेळा, २०२७ करीता श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर परिसरातील अस्तित्वातील तलाव पूर्णपणे भरण्यासाठी व गोदावरी नदीतील पाणी प्रवाहीत राहण्यासाठी आवश्यक उपसायोजनेसह वॉटर ग्रीड तयार करणे करीता.
प्रकल्पाचे वर्णन	सिंहस्थ कुंभमेळा, २०२७ करीता श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर परिसरातील अस्तित्वातील तलाव पूर्णपणे भरण्यासाठी व गोदावरी नदीतील पाणी प्रवाहीत राहण्यासाठी आवश्यक उपसायोजनेसह वॉटर ग्रीड तयार करणे करीता मौजे. त्र्यंबकेश्वर, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक येथील एकूण क्षेत्र – ०.१७.४१ हे.आर. भूसंपादन करण्याबाबत.
जमीन संपादन करणाऱ्या अभिकरणाचा तपशील	कार्यकारी अभियंता, नांदुर मधमेश्वर प्रकल्प विभाग, नाशिक.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नाशिक,
दिनांक १२ ऑगस्ट, २०२६.

डॉ. प्रवीण गेडाम (भा.प्र.से.)
विभागीय आयुक्त, नाशिक.

OFFICE OF THE DIVISIONAL COMMISSIONER, NASHIK

New Administration Building, Nashik Road, Nashik 422 101.

NOTIFICATION

RIGHT TO FAIR COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION, REHABILITATION AND RESETTLEMENT ACT, 2013.

No. SIA/SR-78/2026.—**WHEREAS,** section 10A of the Right to Fair Compensation And Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013), (hereinafter referred to as 'the said Act') in its application to the State of Maharashtra, provides that the State Government may, in the public interest, by notification in the *Official Gazette*, exempt any of the projects mentioned in the said section 10A from the application of the provisions of Chapter II and Chapter III of the said Act;

AND WHEREAS, as per Standing order No. SIA/2023/C.R.105/A-2 Dated 17.11.2025 issued by the Revenue and Forest Department, Government of Maharashtra, the power of the State Government under section 10A to grant exemption from application of the provisions of Chapter II and III of the said Act, have been delegated to the Divisional Commissioner;

AND WHEREAS, it appears to the Divisional Commissioner, Nashik that the lands mentioned in Schedule I appended hereto are required or likely to be required for the project mentioned in the Schedule II appended hereto, which is covered under clause (f) of the said section 10A (hereinafter referred to as "the said project");

AND WHEREAS, the Divisional Commissioner, Nashik has ensured the extent of the said lands for the proposed acquisition being bare minimum land required for the said project;

AND WHEREAS, the Divisional Commissioner, Nashik considers it expedient in the public interest to exempt the said project under section 10A of the said Act from the application of the provisions of Chapter II and Chapter III of the said Act;

NOW THEREFORE, in exercise of the powers conferred by section 10A of the said Act, and Standing Order No. SIA/2023/C.R.105/A-2 dated 17.11.2025 issued by State Government and all other powers enabling it in that behalf, the Divisional Commissioner, Nashik hereby, in the public interest, exempts the said project from the application of provisions of Chapter II and Chapter III of the said Act.

AND WHEREAS, the Divisional Commissioner, Nashik considers it expedient in the public interest to exempt the said project under section 10A of the said Act from the application of the provisions of Chapter II and Chapter III of the said Act.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by section 10A of the said Act, and Standing Order No. SIA/2023/C.R.105/A-2 dated 17.11.2025 issued by State Government and all other powers enabling it in that behalf, the Divisional Commissioner, Nashik hereby, in the public interest, exempts the said project from the application of provisions of Chapter II and Chapter III of the said Act.

Schedule–I

Details of Land

Village - Trimbakeshwar Taluka - Trimbakeshwar District- Nashik

Sr. No.	Survey or Gat No.	Approximate Area of required Land (Hectare)
1	363/A/1	0.17.41
	Total Area	**0.17.41**

Schedule – II

Description of the Project

Project Purpose	Measure to ensure the availability of sufficient water in the Godavari river for the holy bath of devotees during the Simhastha Kumbh Mela.
Name of Project	Establishment of Water Grid and implementation of necessary measures to ensure the full capacity of existing water in the Shri Kshetra Trimbakeshwar region, as well as maintaining continuous water flow in the Godavari River for the Simhastha Kumbh Mela, 2027.
Description of project	Regarding the acquisition of 0.17.41 Hectares of land at mouje Trimbakeshwar, Tal. Trimbakeshwar, Dist. Nashik, for the establishment of Water Grid and implementation of necessary measures to ensure the full capacity of existing water in the Shri Kshetra Trimbakeshwar region, as well as maintaining continuous water flow in the Godavari River for the Simhastha Kumbh Mela, 2027.
Details of acquiring agency	Executive Engineer, Nandur Madhmeshwar Project Division, Nashik.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Nashik,
Dated 12th August, 2026

DR. PRAVEEN GEDAM (I.A.S.),
Divisional Commissioner, Nashik.

महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालय

नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ मे २०२६.

महाराष्ट्र राज्य लॉटरी

"महाराष्ट्र सह्याद्री धनलक्ष्मी", "महाराष्ट्र सह्याद्री महालक्ष्मी", "महाराष्ट्र सह्याद्री विजयालक्ष्मी", "महाराष्ट्र सह्याद्री दिपलक्ष्मी","महाराष्ट्र सह्याद्री राजलक्ष्मी" महाराष्ट्र सह्याद्री प्रभालक्ष्मी" व "महाराष्ट्र मोहिनी" या साप्ताहिक सोडतींच्या बक्षिस संरचनेत बदल करण्याबाबत.

वाचा : उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालय, वाशी, नवी मुंबई यांचे पत्र क्र. उपसं (वि व ले)/ मरालॉ/योजना/९८६/२०२६, दि.१७/०४/२०२६.

कार्यालयीन आदेश

कार्यालयीन आदेश क्रमांक : मरालॉ- २०२६/प्र.क्र. २२/ लॉटरी - २.—महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या विविध लॉटरी सोडती केंद्र शासनाचे लॉटरी (विनियमन) अधिनियम, १९९८ व लॉटरी (विनियमन) नियम, २०१० तसेच महाराष्ट्र राज्य लॉटरी (विनियमन) नियम, २००० भाग - १ प्रमाणे कार्यान्वित केल्या जातात. सदर कार्यालयीन आदेशानुसार उपसंचालक (वि.व ले.) यांना कळविण्यात येते की, वस्तू व सेवाकर परिषदेच्या दि.०३/०९/२०२५ रोजी झालेल्या ५६ व्या बैठकीमध्ये वस्तु व सेवा कराच्या दररचनेत केलेले बदल हे दि. २२/०९/२०२५ पासून लागू झाले आहेत. त्यानुसार लॉटरी तिकीट विक्रीवरील वस्तू व सेवाकर हा पूर्वीच्या २८% वरून ४०% इतका लागू करण्यात आलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या "महाराष्ट्र सह्याद्री धनलक्ष्मी" ,"महाराष्ट्र सह्याद्री महालक्ष्मी", "महाराष्ट्र सह्याद्री विजयालक्ष्मी", "महाराष्ट्र सह्याद्री दिपलक्ष्मी", "महाराष्ट्र सह्याद्री राजलक्ष्मी", " महाराष्ट्र सह्याद्री प्रभालक्ष्मी " व " महाराष्ट्र मोहिनी " या साप्ताहिक सोडतींची बक्षिसरचना व कार्यपद्धती खालीलप्रमाणे असेल.

२ " महाराष्ट्र सहयाद्री धनलक्ष्मी","महाराष्ट्र सहयाद्री महालक्ष्मी ", "महाराष्ट्र सहयाद्री विजयालक्ष्मी", "महाराष्ट्र सहयाद्री दिपलक्ष्मी", "महाराष्ट्र सहयाद्री राजलक्ष्मी ", " महाराष्ट्र सहयाद्री प्रभालक्ष्मी " व "महाराष्ट्र मोहिनी " या साप्ताहिक सोडतीमध्ये १० मालिका असून मालिकांचे क्रमांक ०० ते ०९ असे ठेवण्यात आले आहेत. या सोडतीमध्ये पहिले सामायिक बक्षिस रू.१० हजाराचे असून सोडतीच्या तिकीटांचे दर्शनी मूल्य रू. ३०/- (GST सहीत) इतके आहे. या सोडतीमध्ये ५० हजार तिकीटे छापण्यात येणार आहेत. प्रत्येक मालिकेतील तिकीटांचे क्रमांक १००० ते ५९९९ या प्रमाणे देण्यात आलेले आहेत.

३. सदर सोडतीची तिकीट विक्री उपसंचालक (वि. व ले.),वाशी,नवी मुंबई कार्यालयामार्फत करण्यात येईल. त्यानुसार सदर सोडतीची तिकीटे उपसंचालक (वि. व ले.), महाराष्ट्र राज्य लॉटरी, टी-ब्लॉक, १ला मजला, प्लॉट नं. ७, दाणा बाजार,ए.पी.एम.सी. मार्केट,सेक्टर १९-बी, वाशी,नवी मुंबई-४००७०५ येथून विक्रेत्यांना उपलब्ध होतील.

४. सदर सोडतीच्या एका तिकीटाची दर्शनी किंमत रू.३०/- इतकी असून १०० तिकीटांचे १ पुस्तक असेल. सदर सोडतीची तिकीट विक्री करताना महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या तिकीट विक्रेत्यांना खरेदी केलेल्या एकूण लॉटरी तिकीटांच्या दर्शनी किंमतीवर [वस्तु व सेवा करासह (GST)] पुढीलप्रमाणे घाऊक सूट (Discount)देण्यात येईल.

अ.क्र.	तिकीटांची संख्या	अनुज्ञेय घाऊक सूट
१	५०० ते २५००तिकीटे	१०%
२	२५०१ ते ७५०० तिकीटे	१३%
३	७५०१ ते ५०००तिकीटे	१४%

जे घाऊक विक्रेतेसोडतीच्यातिकीटांची प्रत्यक्ष खरेदी करतील त्यांना शासन निर्णय क्रमांक मरालॉ २०१२/ प्र.क्र.४७/लॉटरी-२ दिनांक ०८/०५/२०१२ मधील नमुद अटी व शर्तीनुसार त्यांनी खरेदी केलेल्या एकूण तिकीटांच्या संख्येनुसार (Actual number of total tickets purchased)२% (GST वगळून) विशेष सूट देण्यात येईल.

५. सदर सोडतीच्या तिकीट छपाईचे आदेश उपसंचालक (वि.व ले.) महाराष्ट्र राज्य लॉटरी, टी-ब्लॉक १ला मजला, प्लॉट नं७ .,दाणा बाजार, ए.पी.एम.सी. मार्केट, सेक्टर -१९बी, वाशी, नवी मुंबई या कार्यालयाकडून स्वतंत्ररित्या काढण्यात येतील. या तिकीटाचे आकारमान तिकीट छपाई १६X७ cms.७० GSM Poster Paper Rs . २१२/-प्रति लाख प्रति चौ.से.मी. +१८ % GST इतके राहील. शासन निर्णय क्र.मरालॉ /२०२५/ प्र.क्र.१२ लॉटरी-२ दि.२७/०१/२०२६ मधील नमूद तिकिट छपाईच्या दराप्रमाणे या सोडतीची तिकीटे मे.साई सिक्युरिटी प्रिंटर्स प्रा.लि., फरीदाबाद यांचेकडून घेण्यात येतील. सदर सोडतीच्या तिकीटांची विक्री ही फक्त महाराष्ट्र राज्यातच करण्यात येईल तसेच तिकीटांवर (For sale only In Maharashtra State) असा मजकूर छापण्यात यावा.

६. "महाराष्ट्र सहयाद्री धनलक्ष्मी ","महाराष्ट्र सहयाद्री महालक्ष्मी ", "महाराष्ट्र सहयाद्री विजयालक्ष्मी", "महाराष्ट्र सहयाद्री दिपलक्ष्मी", "महाराष्ट्र सहयाद्री राजलक्ष्मी" " महाराष्ट्र सहयाद्री प्रभालक्ष्मी " व "महाराष्ट्र मोहिनी "या साप्ताहिक सोडतींची बक्षिसरचना -

मालिका : १० (०० ते०९)
तिकिटांचे क्रमांक : १००० ते ५९९९
सोडत दिनांक : माहे जुलै ,२०२६ पासून
सोडतीची वेळ : सायं.४.३० वाजता.

प्रत्येक मालिकेत ५००० तिकिटे
एकूण तिकिटे : ५० हजार
तिकिटांची किंमत : रू.३०/-(GSTसहीत)

बक्षिसे	बक्षिसाची रक्कम	प्रत्येक मालिकेतील बक्षिसांची एकूण संख्या	सर्व मालिकांसील बक्षिसांची एकूण संख्या	सर्व मालिकांतील बक्षिसांची एकूण रक्कमरुपये
पहिले सामाईक बक्षिस (पूर्ण क्रमांक)	१०,०००/-	--	१	१०,०००/-
दुसरे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (१ क्रमांक) (सर्व मालिकांसाठी)	५,०००/-	१	१०	५०,०००
तिसरे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (१० क्रमांक) (सर्व मालिकांसाठी)	२,०००/-	१०	१००	२,००,०००/-
चौथे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (१० क्रमांक) (सर्व मालिकांसाठी)	१,०००/-	१०	१००	१,००,०००/-
पाचवे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (१० क्रमांक) (सर्व मालिकांसाठी)	५००/-	१०	१००	५०,०००
सहावे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (कोणतेही १०० क्रमांक सर्व मालिकांसाठी) (Random पध्दतीने)	३००/-	-	१०००	३,००,०००/-
एकूण			१३११	७,१०,०००/-

७. घाऊक विक्रेत्याने ज्या किरकोळ विक्रेत्यास तिकीटे विकली असतील त्या किरकोळ विक्रेत्यांची यादी घाऊक विक्रेत्याने पुढील तिकीट खरेदीच्यावेळी महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या, वाशी, नवी मुंबई या कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे.

८.सोडतीची कार्यपध्दती :-

या साप्ताहिक सोडती करीता सोडतीचे ठिकाणी ठळकपणे दिसतील अशा ठिकाणी १ ड्रम ठेवण्यात येईल.त्या ड्रमध्ये मालिकांचे अद्याक्षरे/क्रमांक असतील. या सोडतीमध्ये एकूण १० मालिका आहेत. या मालिकांचे क्रमांक ०० ते ०९ असून प्रत्येक मालिके मध्ये १००० ते ५९९९ असे तिकीटांचे क्रमांक असतील. या सोडतीमधील बक्षिस विजेत्या तिकीटाचे क्रमांक निश्चित करण्यासाठी विजेवर चालणाऱ्या व चक्रावर रॅन्डम क्रमांक लावलेल्या सोडत यंत्राचा (ड्रॉ मशीन) वापर केला जाईल.या यंत्राच्या प्रत्येक चक्रावर ० ते ९ अंक असतील.पंच मंडळाच्या अध्यक्षांनी घंटी वाजविल्यावर सोडत यंत्र फिरविले जाऊन सोडतीची सुरुवात होईल.सोडत यंत्र फिरायचे थांवल्यानंतर जे क्रमांक यंत्रावर दिसतील, अध्यक्ष तो अंक घोषित करतील. अंक ज्या क्रमाने निघतील, त्या क्रमांने फलकावर प्रदर्शित केले जातील.

या सोडती मधील दुसरे, तिसरे, चौथे, पाचवे व सहावे बक्षिस काढण्याची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे राहील.

८.१ दुसरे बक्षिस रू. ५,०००/-:- दुसऱ्या रु.५,०००/- च्या बक्षिसासाठी विजेवर चालणारे व चक्रावर रॅन्डम क्रमांक लावलेले सोडत यंत्र (ड्रॉ मशीन) पंचामार्फत फिरवण्यात येईल व पूर्ण अंकाचा एक क्रमांक निश्चित करण्यात येईल. व तो क्रमांक सर्व मालिकांसाठी रू.५,०००/- च्या दुसऱ्या बक्षिसासाठी पात्र असतील

८.२ तिसरे बक्षिस रु. २,०००/- :- तिस-या रु.२,०००/- च्या बक्षिसासाठी विजेवर चालणारे व चक्रावर रॅन्डम क्रमांक लावलेले सोडत यंत्र (ड्रॉ मशीन) पंचामार्फत फिरवण्यात येईल व पूर्ण अंकाचा एक क्रमांक, याप्रमाणे १० क्रमांक स्वतंत्ररित्या निश्चित करण्यात येतील, ज्या तिकीटामध्ये असा क्रमांक आला असेल, अशी सर्व तिकीटे सर्व मालिकांसाठी रु.२,०००/- च्या तिसऱ्या बक्षिसासाठी पात्र असतील,

८.३ चौथे बक्षिस रू. १,०००/-:- चौथ्या रु.१,०००/- च्या बक्षिसासाठी विजेवर चालणारे व चक्रावर रँडम क्रमांक लावलेले सोडत यंत्र (ड्रॉ मशीन) पंचामार्फत फिरवण्यात येईल व पूर्ण अंकाचा एक क्रमांक, याप्रमाणे १० क्रमांक स्वतंत्ररित्या निश्चित करण्यात येतील, ज्या तिकीटामध्ये असा क्रमांक आला असेल, अशी सर्व तिकीटे सर्व मालिकांसाठी रु.१,०००/- च्या चौथ्या बक्षिसासाठी पात्र असतील.

८.४ पाचवे बक्षिस रूः ५००/-:- पाचव्या रु.५००/- च्या बक्षिसासाठी विजेवर चालणारे व चक्रावर रँडम क्रमांक लावलेले सोडत यंत्र (ड्रॉ मशीन) पंचामार्फत फिरवण्यात येईल व पूर्ण अंकाचा एक क्रमांक, याप्रमाणे १० क्रमांक स्वतंत्ररित्या निश्चित करण्यात येतील, ज्या तिकीटामध्ये असा क्रमांक आला असेल, अशी सर्व तिकीटे सर्व मालिकांसाठी रु.५००/- च्या पाचव्या बक्षिसासाठी पात्र असतील.

८.५ सहावे बक्षिस रूः ३००/-:- सहाव्या रु.३००/- च्या बक्षिसासाठी संगणकावर कोणतेही पूर्ण अंकाचे १०० स्वंतत्र भाग्यवान क्रमांक रॅन्डम पध्दतीने काढण्यात येतील व ते क्रमांक सर्व मालिकांसाठी रू. ३००/- च्या सहाव्या बक्षिसासाठी पात्र असतील.

८.६ पहिल्या क्रमाकांचे रू. १०,०००/- चे सामायिक बक्षिस काढण्याची कार्यपध्दतीः

या साप्ताहिक सोडतीमध्ये दहा मालिकांमधून रूपये १० हजाराचे पहिले सामायिक बक्षिस ठेवण्यात आलेले असून त्यासाठी प्रथमतः १० मालिकांमधून एक भाग्यवान मालिका निश्चित करण्यात येईल. त्यासाठी प्रत्येक मालिकेची आद्याक्षरे असलेली प्रत्येकी एक चकती घेण्यात येऊन ती प्रत्येक चकती स्वतंत्र प्लॅस्टिक/रबरी आवरणात घालून पंचमंडळाच्या समोर ड्रममध्ये ठेवली जाईल. अध्यक्षांनी घंटी वाजवून इशारा केल्यावर ड्रम फिरविला जाऊन व पुन्हा घंटी वाजवून इशारा केल्यावर ड्रम थांवविण्यात येईल. ड्रममधून एकच पिशवी (पाऊच) वाहेर काढून त्यातून चकती वाहेर काढण्यात येईल व ती पंचमंडळाला दाखविण्यात येईल. अध्यक्ष त्या चकतीवरील मालिकेच्या अद्याक्षरांची घोषणा करतील. त्यानंतर वरील परिच्छेद ८ मध्ये विहित केलेल्या पध्दतीने भाग्यवान क्रमांक काढण्यात येईल.

८.७ पंचमंडळाचे सदस्य त्यांना पुरविलेल्या बक्षिस विजेत्या क्रमांकाच्या नोंदवहीत विजेत्या क्रमांकाची नोंद करुन घेतील व त्या प्रतीवर सही करतील आणि ती प्रत निकालाच्या अभिलेखाची विश्वसनीय प्रत म्हणून ठेवली जाईल.

८.८ या सोडतीमध्ये रॅन्डम क्रमांक वगळून इतर सर्व यक्षिसामध्ये एकापेक्षा जास्त भाग्यवान क्रमांक निश्चित करताना एखादा क्रमांक पुन्हा आल्यास तो रद्द करुन त्या ऐवजी पुन्हा नवीन भाग्यवान क्रमांक निश्चित करण्यात येईल.

८.९ या सोडतीतील बक्षिस विजेत्याने कोणत्याही बक्षिसाची मागणी करताना त्यास मूळ तिकीट शासनाकडे सादर करणे बंधनकारक राहील, तसेच कोणत्याही तिकीटांवर एकाच बक्षिसाची मागणी करता येईल.

८.१० महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या कोणत्याही सोडतीमधील एखाद्या बक्षिसाकरिता एकापेक्षा जास्त पूर्ण भाग्यवान क्रमांक काढण्यात येत असतील अशावेळी कोणत्याही क्रमांकाची त्याच मालिकेत पुनरावृत्ती झाल्यास किंवा दोन्ही क्रमांक / एकापेक्षा जास्त क्रमांक सारखे आल्यास नंतर काढलेले क्रमांक रद्द करून त्याऐवजी नवीन क्रमांक काढण्यात येतील.

८.११ वर नमुद केल्याप्रमाणे या सोडतीमधील बक्षिस विजेत्या तिकीटांचे क्रमांक निश्चित करण्यासाठी ड्रम किंवा विजेचर चालणारी व चक्रावर क्रमांक असलेली (ड्रॉ मशिन) सोडतयंत्र, या त्याचप्रमाणे सोडत जलद काढण्याच्या शासनाच्या दृष्टीने योग्य पध्दतीचा अवलंब सोडत काढताना करण्यात येईल.

८.१२ संगणकात तांत्रिक विघाड होणे, वीजपुरवठा खंडीत होणे किंवा अकल्पीत नैसर्गिक आपत्ती इ. कारंणामुळे जर सोडत काढता आली नाही तर ती सोडत पुढील दिवशी काढून निकाल जाहीर करण्यात येईल.

९. सदर सोडतीची कार्यपध्दती पूर्ण झाल्यानंतर शासनाच्या विहित तरतूदी / कायद्यानुसार या सोडतीच्या निकालाची प्रसिध्दी शासनाच्या राजपत्रात करण्याची कार्यवाही उपसंचालक (वि.व ले.),महाराष्ट्र राज्य लॉटरी, टी-ब्लॉक, १ला मजला, प्लॉट नं. ७,दाणा बाजार,ए.पी.एम.सी.मार्केट,सेक्टर १९-बी, वाशी,नवी मुंबई-४००७०५ या कार्यालयाकडून करण्यात येईल व याबाबतची संपूर्ण जबाबदारी त्यांची राहिल.

१०. सदर सोडतीचा तिकीट छपाईचाखर्च हा मागणी क्र. जी -२, २०७५, संकीर्ण सर्वसाधारण सेवा, १०३ राज्य लॉटरी, लॉटरी (००) (०१) प्रमुख लॉटरी, लॉटरी संचालनालय (२०७५० ४७२),१६ - प्रकाशने तसेच बक्षिस विजेत्या तिकीटांचा खर्च हा मागणी क्र. जी -२, २०७५, संकीर्ण सर्वसाधारण सेवा, १०३ राज्य लॉटरी, (००)(०१) प्रमुख लॉटरी, लॉटरी संचालनालय लॉटरी (२०७५०४७२) ०५- बक्षिसे या लेखाशिर्षामधील सन २०२६-२७ मधील उपलब्ध तरतूदींतून भागविण्यात यावा.

११. भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाचे Notification No.4/2017- Central Tax (Rates) दिनांक २८/०६/२०१७ मध्ये पुढील प्रमाणे तरतुद आहे.

Sr. No.	Tariff item, sub-heading, heading chapter	Description supply of Goods	Supplier of goods	Recipient of supply
5.	--	Supply of lottery	State Government Union Territory or any local authority	Lottery distributor or selling agent. *Explanation.*- For the purposes of this entry. lottery distributor or selling agent has the same meaning as assigned to it in clause (c) of Rule 2 the Lotteries (Regulation) Rules, 2010, made under the provisions of sub-section I of section of the lotteries (Regulations) Act, 1998 (17 of 1998).

केंद्र शासनाचे लॉटरी (विनियमन) नियम २०१० च्या नियम २ (c) मध्ये "distributor or selling agent" means an individual or a firm or a body corporate or other legal entity under law so appointed by the Organizing State through an agreement to market and sell lotteries on behalf of the Organizing State"असे नमूद आहे.

तथापि, सदर तरतुदींनुसार महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या पारंपारिक लॉटरी सोडतींच्या तिकीट विक्रीसाठी शासनाने करार करून कोणताही अधिकृत विक्रेता नियुक्त केलेला नाही. त्यामुळे वरील नमूद नोटीफिकेशन मधील तरतुदींनुसार अधिकृत वितरक / विक्रेता वस्तु व सेवा कर भरणा करण्यांसाठी आस्तित्वात नाही. अशा परिस्थितीत वस्तु व सेवा कर वसूल करून भरण्यासंदर्भात आयुक्त, वस्तु व सेवा कर कार्यालयाने पुढील प्रमाणे स्पष्टीकरण दिलेले आहे.

" If State Government supplies these lottery Tickets directly to any person, who is not legally appointed/authorized as lottery distributor or selling agent as described in clause (c) of Rule 2 of the Lotteries (Regulation) Rules, 2010,- Tax shall be collected and shall be paid by State Government only, as aforesaid."

तरी वरील स्पष्टीकरणानुसार महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या या प्रस्तावित सोडतींवरील लॉटरी तिकीटांच्या विक्रीवर तिकीट विक्रेत्यांकडून केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार विहित केलेल्या दरानेवस्तु व सेवा कर वसूल करून विहित पध्दतीने शासनाकडे भरण्याची कार्यवाही उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालय, वाशी, नवी मुंबई यांनी करावी व याबाबतची संपूर्ण जबाबदारी त्यांची राहिल.

१२. सदर कार्यालयीन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.lottery.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

प्रमोद भगत,
अवर सचिव तथा उपसंचालक,
राज्य लॉटरी, वित्त विभाग.

महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालय

नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ मे २०२६.

महाराष्ट्र राज्य लॉटरी
"महाराष्ट्र सागरलक्ष्मी","महाराष्ट्र पद्मिनी", "महाराष्ट्र अक्षय", "महाराष्ट्र आकर्षक पुष्कराज", "महाराष्ट्र वैभवलक्ष्मी" व "महाराष्ट्रलक्ष्मी" या साप्ताहिक सोडतींच्या बक्षिस संरचनेत बदल करणेबाबत.

वाचा : उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालय, वाशी, नवी मुंबई यांचे पत्र क्र. उपसं (वि व ले)/मरालॉ/योजना/१०३४/२०२६, दि. २३/०४/२०२६.

कार्यालयीन आदेश

कार्यालयीन आदेश क्रमांक : मरालॉ-२०२६/प्र.क्र.२५/ लॉटरी-२.—महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या विविध लॉटरी सोडती केंद्र शासनाचे लॉटरी (विनियमन) अधिनियम, १९९८ व लॉटरी (विनियमन) नियम, २०१० तसेच महाराष्ट्र राज्य लॉटरी (विनियमन) नियम, २००० भाग - १ प्रमाणे कार्यान्वित केल्या जातात. सदर कार्यालयीन आदेशानुसार उपसंचालक (वि. व ले.) यांना कळविण्यात येते की, वस्तू व सेवाकर परिषदेच्या दि.०३/०९/२०२५ रोजी झालेल्या ५६ व्या बैठकीमध्ये वस्तू व सेवा कराच्या दररचनेत केलेले बदल हे दि.२२/०९/२०२५ पासून लागू झाले आहेत. त्यानुसार लॉटरी तिकीट विक्रीवरील वस्तू व सेवा कर हा पूर्वीच्या २८% वरून ४०% इतका लागू करण्यात आलेला आहे. त्यानुसार "महाराष्ट्र सागरलक्ष्मी" ,"महाराष्ट्र पद्मिनी","महाराष्ट्र अक्षय", "महाराष्ट्र आकर्षक पुष्कराज", "महाराष्ट्र वैभवलक्ष्मी" व "महाराष्ट्रलक्ष्मी" या साप्ताहिक सोडतींची बक्षिसरचना व कार्यपद्धती खालीलप्रमाणे असेल.

२. "महाराष्ट्र सागरलक्ष्मी","महाराष्ट्र पद्मिनी","महाराष्ट्र अक्षय","महाराष्ट्र आकर्षक पुष्कराज", "महाराष्ट्र वैभवलक्ष्मी, व " महाराष्ट्रलक्ष्मी" "हया सोडतीच्या तिकीटांचे दर्शनी मूल्य रू. ५०/- (GST सहीत) असून या सोडतीमध्ये पहिले सामायिक बक्षिस रू. ७ लाखाचे १ बक्षिस ठेवण्यात आले आहे. या सोडतीत एकूण १० मालिका असून या प्रमाणे एकूण ७० हजार तिकीटे मुद्रीत करण्यात येणार आहेत. या मालिकांचे क्रमांक ०० ते ०९ असून प्रत्येक मालिकेमध्ये १००० ते ७९९९ या प्रमाणे तिकीटांचे क्रमांक देण्यात आलेले आहेत.

३. सदर सोडतीची तिकीट विक्री उपसंचालक (वि. व ले.),वाशी,नवी मुंबई या कार्यालयामार्फत करण्यात येईल. त्यानुसार सदर सोडतीची तिकीटे उपसंचालक (वि. व ले.), महाराष्ट्र राज्य लॉटरी, टी-ब्लॉक, १ ला मजला, प्लॉट नं. ७, दाणा बाजार, ए. पी. एम.सी. मार्केट,सेक्टर १९-बी, वाशी,नवी मुंबई-४००७०५ येथून विक्रेत्यांना उपलब्ध होतील.

४. सदर सोडतीच्या एका तिकीटाची दर्शनी किंमत रू.५०/- इतकी असून १०० तिकीटांचे १ पुस्तक असेल. सदर सोडतीची तिकीट विक्री करताना महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या तिकीट विक्रेत्यांना खरेदी केलेल्या एकूण लॉटरी तिकीटांच्या दर्शनी किंमतीवर [वस्तु व सेवा करासह (GST)] पुढीलप्रमाणे घाऊक सूट (Discount)देण्यात येईल.

अ.क्र.	तिकीटांची संख्या	अनुज्ञेय घाऊक सूट
१	५०० ते १०००० तिकीटे	१६%
२	१०००१ ते १५००० तिकीटे	२०%
३	१५००१ते ७०००० तिकीटे	२२%

जे घाऊक विक्रेते सोडतीच्या तिकीटांची प्रत्यक्ष खरेदी करतील त्यांना शासन निर्णय क्रमांक - मरालॉ २०१२/ प्र.क्र.४७/लॉटरी-२ दिनांक ०८/०५/२०१२ मधील नमुद अटी व शर्तीनुसार त्यांनी खरेदी केलेल्या एकूण तिकीटांच्या संख्येनुसार (Actual number of total tickets purchased)२% (GST वगळून) विशेष सूट देण्यात येईल.

५. सदर सोडतींच्या तिकीट छपाईचे आदेश उपसंचालक (वि.व ले.) महाराष्ट्र राज्य लॉटरी, टी ब्लॉक,१ ला मजला, प्लॉट नं ७ ,दाणा बाजार,ए.पा.एम.सी. मार्केट, सेक्टर -१९बी, वाशी,नवी मुंबई या कार्यालयाकडून स्वतंत्ररित्या काढण्यात येतील .या तिकीटाचे आकारमान तिकीट छपाई १९X ८.५ cms.९० G.S.M Croma Art Paper Rs. २८०/- प्रतिलाख प्रति चौमी.से.+१८% GST इतके राहिल. शासन निर्णय क्र.मरालॉ क्र. २०२५/ प्र.क्र.१२/लॉ-२, दि.२७/०१/२०२६ मधील नमूद तिकिट छपाईच्या दराप्रमाणे या सोडतीची तिकीटे मे. साई सिक्युरिटी प्रिंटर्स प्रा ,.लि. फरीदाबाद यांचेकडून घेण्यात येतील. सदर सोडतींच्या तिकीटांची विक्री ही फक्त महाराष्ट्र राज्यातच करण्यात येईल. तसेच तिकीटांवर (For sale only in Maharashtra State) असा मजकूर छापण्यात यावा.

६. "महाराष्ट्र सागरलक्ष्मी", "महाराष्ट्र पद्मिनी", "महाराष्ट्र अक्षय", "महाराष्ट्र आकर्षक पुष्कराज", "महाराष्ट्र वैभवलक्ष्मी " व "महाराष्ट्रलक्ष्मी " या साप्ताहिक सोडतींची बक्षिसरचना

मालिका : १० (०० ते ०९)
तिकिटांचे क्रमांक : १००० ते ७९९९
सोडत दिनांक : माहे जुलै २०२६ पासून
सोडतीची वेळ : सायं.४.१५ वाजता.

प्रत्येक मालिकेत ७००० तिकिटे
एकूण तिकिटे : ७० हजार
तिकिटांची किंमत : रू.५०/-

बक्षिसे	बक्षिसाची रक्कम रूपये	प्रत्येक मालिकेतील बक्षिसांची एकूण संख्या	सर्व मालिकांतील बक्षिसांची एकूण संख्या	सर्व मालिकांतील बक्षिसांची एकूण रक्कम रुपये	बोनस
पहिले सामाईक वक्षिस (पूर्ण क्रमांक)	७,००,०००/-	----	१	७,००,०००/-	७,०००/-
प्रोत्साहनपर बक्षिसे (पूर्ण क्रमांक) (पहिल्या बक्षिसाची मालिका वगळून उर्वरित ९ मालिकांसाठी)	२,५००/-	-----	९	२२,५००/-	
दुसरे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (१ क्रमांक) (सर्व मालिकांसाठी)	७,०००/-	१	१०	७०,०००/-	
तिसरे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (१ क्रमांक) (सर्व मालिकांसाठी)	५,०००/-	१	१०	५०,०००/-	
चौथे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (१० क्रमांक) (सर्व मालिकांसाठी)	२,०००/-	१०	१००	२,००,०००/-	
पाचवे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (१० क्रमांक) (सर्व मालिकांसाठी)	५००/-	१०	१००	५०,०००/-	
सहावे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (१० क्रमांक) (सर्व मालिकांसाठी)	२००/-	१०	१००	२०,०००/-	
सातवे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (कोणतेही ३५० क्रमांक सर्व मालिकांसाठी) (Random पध्दतीने)	११०/-	---	३५००	३,८५,०००/-	
		एकूण:-	३८३०	१४,९७,५००/-	७,०००/-

७. घाऊक विक्रेत्याने ज्या किरकोळ विक्रेत्यास तिकीटे विकली असतील त्या किरकोळ विक्रेत्यांची यादी घाऊक विक्रेत्याने पुढील तिकीट खरेदीच्यावेळी महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या, वाशी, नवी मुंबई या कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे.

८.सोडतीची कार्यपध्दती :-

या सोडतीकरीता सोडतीचे ठिकाणी ठळकपणे दिसतील अशा ठिकाणी १ ड्रम ठेवण्यात येईल.त्या ड्रममध्ये मालिकांचे अद्याक्षरे/क्रमांक असतील.या सोडतीमध्ये एकूण १० मालिका आहेत.या मालिकांचे क्रमांक ०० ते ०९ असून प्रत्येक मालिकेमध्ये १००० ते ७९९९ असे तिकीटांचे क्रंमाक असतील. या सोडतीमधील बक्षिस विजेत्या क्रमांक निश्चित करण्यासाठी विजेवर चालणारी व चक्रावर रॅन्डम क्रमांक लावलेल्या सोडत यंत्राचा (ड्रॉ मशीन) वापर केला जाईल. या यंत्राच्या प्रत्येक चक्रावर ० ते ९ अंक असतील. पंचमंडळाच्या अध्यक्षांनी घंटी वाजविल्यावर सोडत यंत्र फिरविले जाऊन सोडतीची सुरूवात होईल. सोडत यंत्र थांबल्यानंतर जे क्रमांक यंत्रावर दिसतील अध्यक्ष तो अंक घोषित करतील. अंक ज्या क्रमाने निघतील त्या क्रमाने फलकावर प्रदर्शित केले जातील.

या साप्ताहिक सोडतीमधील दुसरे, तिसरे, चौथे, पाचवे सहावे व सातवे बक्षिस काढण्याची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे राहील.

८.१ दुसरे बक्षिस रू.७,०००/- :- दुसऱ्यारु.७,०००/-च्या बक्षिसासाठी विजेवर चालणारे व चक्रावर रॅन्डम क्रमांक लावलेले सोडत यंत्र (ड्रॉ मशीन) पंचामार्फत फिरवण्यात येईल व पूर्ण अंकाचा एक क्रमांक निश्चित करण्यात येईल व तो क्रमांक सर्व मालिकांसाठी रू. ७,०००/- च्या दुसऱ्या बक्षिसासाठी पात्र असतील.

८.२ तिसरे बक्षिस रू. ५,०००/- :- तिसऱ्या रु. ५,०००/- च्या बक्षिसासाठी विजेवर चालणारे व चक्रावर रॅन्डम क्रमांक लावलेले सोडत यंत्र (ड्रॉ मशीन) पंचामार्फत फिरवण्यात येईल व पूर्ण अंकाचा एक क्रमांक निश्चित करण्यात येईल व तो क्रमांक सर्व मालिकांसाठी रू. ५,०००/- च्या तिसऱ्या बक्षिसासाठी पात्र असतील.

८.३ चौथे बक्षिस रू. २,०००/- :- चौथ्या रु. २,०००/- च्या बक्षिसासाठी विजेवर चालणारे व चक्रावर रैन्डम क्रमांक लावलेले सोडत यंत्र (ड्रॉ मशीन) पंचामार्फत फिरवण्यात येईल व पूर्ण अंकाचा एक क्रमांक, याप्रमाणे १० क्रमांक स्वतंत्ररित्या निश्चित करण्यात येतील, ज्या तिकीटामध्ये असा क्रमांक आला असेल, अशी सर्व तिकीटे सर्व मालिकांसाठी रू. २,०००/- च्या चौथ्या बक्षिसासाठी पात्र असतील.

८.४ पाचवे बक्षिस रू. ५००/- :- पाचव्या रु. ५००/- च्या बक्षिसासाठी विजेवर चालणारे व चक्रावर रॅन्डम क्रमांक लावलेले सोडत यंत्र (ड्रॉ मशीन) पंचामार्फत फिरवण्यात येईल व पूर्ण अंकाचा एक क्रमांक, याप्रमाणे १० क्रमांक स्वतंत्ररित्या निश्चित करण्यात येतील. ज्या तिकीटामध्ये असा क्रमांक आला असेल, अशी सर्व तिकीटे सर्व मालिकांसाठी रू. ५००/- च्या पाचव्या बक्षिसासाठी पात्र असतील.

८.५ सहावे बक्षिस रू. २००/- :- सहाव्या रु. २००/- च्या बक्षिसासाठी विजेवर चालणारे व चक्रावर रॅन्डम क्रमांक लावलेले सोडत यंत्र (ड्रॉ मशीन) पंचामार्फत फिरवण्यात येईल व पूर्ण अंकाचा एक क्रमांक, याप्रमाणे १० क्रमांक स्वतंत्ररित्या निश्चित करण्यात येतील. ज्या तिकीटामध्ये असा क्रमांक आला असेल, अशी सर्व तिकीटे सर्व मालिकांसाठी रू. २००/- च्या सहाव्या बक्षिसासाठी पात्र असतील.

८.६ सातवे बक्षिस रू. ११०/- :- सातव्या रू. ११०/- च्या बक्षिसासाठी संगणकावर कोणतेही पूर्ण अंकाचे ३५० स्वंतत्र भाग्यवान क्रमांक रॅन्डम पध्दतीने काढण्यात येतील व ते क्रमांक सर्व मालिकांसाठी रू. ११०/-च्या सातव्या बक्षिसासाठी पात्र असतील.

८.७ पहिल्या क्रमाकांचे रू.७,००,०००/- चे सामायिक बक्षिस काढण्याची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे :-

या साप्ताहिक सोडतींमध्ये दहा मालिकांत मिळून रूपये सात लाखाचे पहिले सामायिक बक्षिस ठेवण्यात आलेले असून त्यासाठी प्रथमतः दहा मालिकांमधून एक भाग्यवान मालिका निश्चित करण्यात येईल. त्यासाठी प्रत्येक मालिकेची क्रमांक असलेली प्रत्येकी एक चकती घेण्यात येऊन, ती प्रत्येक चकती स्वतंत्र प्लॅस्टिक/रबरी आवरणात घालून पंचमंडळाच्या समोर ड्रममध्ये ठेवली जाईल. अध्यक्षांनी घंटी वाजवून इशारा केल्यावर ड्रम फिरविला जाऊन व पुन्हा घंटी वाजवून इशारा केल्यावर ड्रम थांबविण्यात येईल. ड्रममधून एकच पिशवी (पाऊच) बाहेर काढून त्यातून चकती बाहेर काढण्यात येईल व ती पंचमंडळाला दाखविण्यात येईल. अध्यक्ष त्या चकतीवरील मालिकेच्या आद्याक्षरांची घोषणा करतील, त्यानंतर वरील परिच्छेद ८ मध्ये विहित केलेल्या पध्दतीने भाग्यवान क्रमांक काढण्यात येईल.

८.८ प्रोत्साहनपर बक्षिस रू.२,५००/- ची ९ बक्षिसे काढण्याची कार्यपध्दती:-

या प्रोत्साहपर बक्षिसासाठी पहिल्या क्रमांकाच्या बक्षिसाची मालिका वगळून उर्वरित ९ मालिकांकरिता पहिल्या बक्षिसांसाठी निश्चित करण्यात आलेल्या भाग्यवान क्रमांकास रू. २,५००/- चे प्रोत्साहनपर बक्षिस देण्यात येईल.

८.९ पंचमंडळाचे सदस्य त्यांना पुरविलेल्या बक्षिस विजेत्या क्रमांकाच्या नोंदवहीत विजेत्या क्रमांकाची नोंद करुन घेतील व त्या प्रतीवर सही करतील आणि ती प्रत निकालाच्या अभिलेखाची विश्वसनीय प्रत म्हणून ठेवली जाईल.

८.१० या सोडतीमध्ये रेन्डम क्रमांक वगळून इतर सर्व बक्षिसामध्ये एकापेक्षा जास्त भाग्यवान क्रमांक निश्चित करताना एखादा क्रमांक पुन्हा आल्यास तो रद्द करुन त्याऐवजी पुन्हा नवीन भाग्यवान क्रमांक निश्चित करण्यात येईल.

८.११ या सोडतीतील बक्षिस विजेत्याने कोणत्याही बक्षिसाची मागणी करताना त्यास मूळ तिकीट शासनाकडे सादर करणे बंधनकारक राहील, तसेच कोणत्याही तिकीटांवर एकाच बक्षिसाची मागणी करता येईल.

८.१२ महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या कोणत्याही सोडतीमधील एखाद्या बक्षिसाकरिता एकापेक्षा जास्त पूर्ण भाग्यवान क्रमांक काढण्यात येत असतील, अशावेळी कोणत्याही क्रमांकाची त्याच मालिकेत पुनरावृत्ती झाल्यास किंवा दोन्ही क्रमांक / एकापेक्षा जास्त क्रमांक सारखे आल्यास नंतर काढलेले क्रमांक रद्द करून त्याऐवजी नवीन क्रमांक काढण्यात येतील.

८.१३ वर नमुद केल्याप्रमाणे या सोडतीमधील बक्षिस विजेत्या तिकीटांचे क्रमांक निश्चित करण्यासाठी ड्रम किंवा विजेवर चालणारी व चक्रावर क्रमांक असलेली (ड्रॉ मशिन) सोडतयंत्र, या त्याचप्रमाणे सोडत जलद काढण्याच्या शासनाच्या दृष्टीने योग्य पध्दतीचा अवलंब सोडत काढताना करण्यात येईल.

८.१४ संगणकात तांत्रिक बिघाड होणे, वीजपुरवठा खंडीत होणे किंवा अकल्पित नैसर्गिक आपत्ती इ. कारंणामुळे जर सोडत काढता आली नाही तर ती सोडत पुढील दिवशी काढून निकाल जाहीर करण्यात येईल.

९. सदर सोडतीची कार्यपध्दती पूर्ण झाल्यानंतर शासनाच्या विहित तरतूदी / कायद्यानुसार या सोडतीच्या निकालाची प्रसिध्दी शासनाच्या राजपत्रात करण्याची कार्यवाही उपसंचालक (वि.व ले.),महाराष्ट्र राज्य लॉटरी, टी-ब्लॉक, १ला मजला, प्लॉट नं. ७, दाणा बाजार,ए.पी.एम.सी.मार्केट,सेक्टर १९-बी, वाशी,नवी मुंबई-४००७०५ या कार्यालयाकडून करण्यात येईल व याबाबतची संपूर्ण जबाबदारी त्यांची राहिल.

१०. सदर सोडतीचा तिकीट छपाईचाखर्च हा मागणी क्र. जी -२, २०७५, संकीर्ण सर्वसाधारण सेवा, १०३ राज्य लॉटरी, (००) (०१) प्रमुख लॉटरी, लॉटरी संचालनालय (२०७५० ४७२), १६- प्रकाशने तसेच बक्षिस विजेत्या तिकीटांचा खर्च हा मागणी क्र.जी-२, २०७५, संकीर्ण सर्वसाधारण सेवा, १०३ राज्य लॉटरी, (००) (०१) प्रमुख लॉटरी, लॉटरी संचालनालय लॉटरी (२०७५०४७२) ०५- बक्षिसे या लेखाशिर्षामधील सन २०२६-२७ मधील उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात यावा.

११. भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाचे Notification No.**4/2017-** Central Tax (Rates)दिनांक २८/०६/२०१७ मध्ये पुढील प्रमाणे तरतुद आहे.

Sr. No.	**Tariff item, sub-heading, heading or chapter**	**Description of supply of Goods**	**Supplier of goods**	**Recipient of supply**
5.	--	Supply of lottery	State Government , Union Territory or any local authority	Lottery distributor or selling agent. *Explanation.*- For the purposes of this entry. lottery distributor or selling agent has the same meaning as assigned to it in clause (c) of Rule 2 of the Lotteries (Regulation) Rules, 2010, made under the provisions of sub-section I of section II of the lotteries (Regulations) Act, 1998 (17 of 1998).

केंद्र शासनाचे लॉटरी (विनियमन) नियम २०१० च्या नियम २ (c) मध्ये "distributor or selling agent" means an individual or a firm or a body corporate or other legal entity under law so appointed by the Organizing State through an agreement to market and sell lotteries on behalf of the Organizing State"असे नमूद आहे.

तथापि, सदर तरतुदींनुसार महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या पारंपारिक लॉटरी सोडतींच्या तिकीट विक्रीसाठी शासनाने करार करून कोणताही अधिकृत विक्रेता नियुक्त केलेला नाही. त्यामुळे वरील नमूद नोटीफिकेशन मधील तरतुदींनुसार अधिकृत वितरक / विक्रेता वस्तु व सेवा कर भरणा करण्यासाठी आस्तित्वात नाही. अशा परिस्थितीत वस्तु व सेवा कर वसूल करून भरण्यासंदर्भात आयुक्त, वस्तु व सेवा कर कार्यालयाने पुढील प्रमाणे स्पष्टीकरण दिलेले आहे.

" If State Government supplies these lottery Tickets directly to any person, who is not legally appointed/authorized as lottery distributor or selling agent as described in clause (c) of Rule 2 of the Lotteries (Regulation) Rules, 2010,- Tax shall be collected and shall be paid by State Government only, as aforesaid."

तरी वरील स्पष्टीकरणानुसार महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या या प्रस्तावित सोडतींवरील लॉटरी तिकीटांच्या विक्रीवर तिकीट विक्रेत्यांकडून केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार विहित केलेल्या दराने वस्तु व सेवा कर वसूल करून विहित पध्दतीने शासनाकडे भरण्याची कार्यवाही उपसंचालक (वित्त व लेखा),महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालय, वाशी, नवी मुंबई यांनी करावी व याबाबतची संपूर्ण जबाबदारी त्यांची राहिल.

१२. सदर कार्यालयीन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.lottery.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

प्रमोद भगत,
अवर सचिव तथा उपसंचालक,
राज्य लॉटरी, वित्त विभाग.

महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालय

नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ मे २०२६.

महाराष्ट्र राज्य लॉटरी
"महाराष्ट्र गणेशलक्ष्मी भाग्यशाली", "महाराष्ट्र गणेशलक्ष्मी शुभ", "महाराष्ट्र गणेशलक्ष्मी विजयी", "महाराष्ट्र गणेशलक्ष्मी गौरव", "महाराष्ट्र गणेशलक्ष्मी धन","महाराष्ट्र गणेशलक्ष्मी समृद्धी" व "महाराष्ट्र गणेशलक्ष्मी वैभव" या साप्ताहिक सोडतींच्या बक्षिस संरचनेत बदल करण्याबाबत.

वाचा : उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालय, वाशी, नवी मुंबई यांचे पत्र क्र. उपसं (वि व ले)/मरालॉ/योजना/९७२/२०२६, दि. १६/०४/२०२६.

कार्यालयीन आदेश

कार्यालयीन आदेश क्रमांक : मरालॉ-२०२६/प्र.क्र.१९/ लॉटरी-२.—महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या विविध लॉटरी सोडती केंद्र शासनाचे लॉटरी (विनियमन) अधिनियम, १९९८ व लॉटरी (विनियमन) नियम, २०१० तसेच महाराष्ट्र राज्य लॉटरी (विनियमन) नियम, २००० भाग-१ प्रमाणे कार्यान्वित केल्या जातात. सदर कार्यालयीन आदेशानुसार उपसंचालक (वि.व ले.) यांना कळविण्यात येते की, वस्तू व सेवा कर परिषदेच्या दि.०३/०९/२०२५ रोजी झालेल्या ५६व्या बैठकीमध्ये वस्तू व सेवा कराच्या दररचनेत केलेले बदल हे दि.२२/०९/२०२५ पासून लागू झाले आहेत. त्यानुसार लॉटरी तिकीट विक्रीवरील वस्तू व सेवा कर हा पूर्वीच्या २८% वरून ४०% इतका लागू करण्यात आलेला आहे. त्यामुळे "महाराष्ट्र गणेशलक्ष्मी भाग्यशाली","महाराष्ट्र गणेशलक्ष्मी शुभ", "महाराष्ट्र गणेशलक्ष्मी विजयी","महाराष्ट्र गणेशलक्ष्मी गौरव", "महाराष्ट्र गणेशलक्ष्मी धन", "महाराष्ट्र गणेशलक्ष्मी समृद्धी" व "महाराष्ट्र गणेशलक्ष्मी वैभव" या साप्ताहिक सोडतीच्या बक्षिसरचनेत खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

२. "महाराष्ट्र गणेशलक्ष्मी भाग्यशाली " ," महाराष्ट्र गणेशलक्ष्मी शुभ", "महाराष्ट्र गणेशलक्ष्मी विजयी","महाराष्ट्र गणेशलक्ष्मी गौरव" महाराष्ट्र गणेशलक्ष्मी धन ","महाराष्ट्र गणेशलक्ष्मी समृध्दी" व" महाराष्ट्र गणेशलक्ष्मी वैभव" या सोडतींच्या तिकीटांचे दर्शनी मूल्य रू. १०/- (GST सहीत) असून एकूण १ लाख तिकीटे मुद्रीत करण्यात येतील. पहिले सामायिक बक्षिस रू.१० हजाराचे १ बक्षिस ठेवण्यात आले आहे. या सोडतीमध्ये एकूण १० मालिका आहेत. या मालिकांचे क्रमांक ०० ते ०९ असून प्रत्येक मालिकेतील तिकीटांचे क्रमांक ०००० ते ९९९९ या प्रमाणे देण्यात आलेले आहेत.

३. सदर सोडतींची तिकीट विक्री उपसंचालक (वि. व ले.), वाशी,नवी मुंबई कार्यालयामार्फत्त करण्यात येईल. त्यानुसार सदर सोडतींची तिकीटे उपसंचालक (वि. व ले.), महाराष्ट्र राज्य लॉटरी, टी-ब्लॉक, १ ला मजला, प्लॉट नं. ७, दाणा बाजार,ए.पी.एम.सी. मार्केट,सेक्टर १९-बी, वाशी, नवी मुंबई-४००७०५ येथून विक्रेत्यांना उपलब्ध होतील.

४. सदर सोडतींच्या एका तिकीटाची दर्शनी किंमत रू.१०/- इतकी असून १०० तिकीटांचे १ पुस्तक असेल. सदर सोडतींची तिकीट विक्री करताना महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या तिकीट विक्रेत्यांना खरेदी केलेल्या एकूण लॉटरी तिकीटांच्या दर्शनी किंमतीवर [वस्तु व सेवा करासह (GST)] पुढीलप्रमाणे घाऊक सूट (Discount) देण्यात येईल.

अ.क्र.	तिकीटांची संख्या	अनुज्ञेय घाऊक सूट GST सहीत
१	५०० ते १०००० तिकीटे	१०%
२	१०००१ ते २०००० तिकीटे	१३ %
३	२०००१ते १००००० तिकीटे	१४%

घाऊक विक्रेते सोडतींच्या तिकीटांची प्रत्यक्ष खरेदी करतील त्यांना शासन निर्णय क्रमांक मरालॉ २०१२/ प्र.क्र.४७/लॉटरी-२ दिनांक ०८/०५/२०१२ मधील नमुद अटी व शर्तीनुसार त्यांनी खरेदी केलेल्या एकूण तिकीटांच्या संख्येनुसार (Actual number of total tickets purchased) २% विशेष सूट देण्यात येईल.

५. सदर सोडतींच्या तिकीट छपाईचे आदेश उपसंचालक (वि.व ले.) महाराष्ट्र राज्य लॉटरी, टी ब्लॉक,१ ला मजला, प्लॉट नं ७ ,दाणा बाजार,ए.पा.एम.सी. मार्केट, सेक्टर -१९बी, वाशी,नवी मुंवई या कार्यालयाकडून स्वतंत्ररित्या काढण्यात येतील .या तिकीटाचे आकारमान १२X ६ cms. ७० GSM Poster Paper Rs. २१२/-प्रति लाख प्रति चौ.मी.से.+१८% GST इतके राहिल. शासन निर्णय क्र.मरालॉ क्र. २०२५/ प्र.क्र.१२/लॉ-२, दि.२७/०१/२०२६ मधील नमूद तिकिट छपाईच्या दराप्रमाणे या सोडतीची तिकीटे मे. साई सिक्युरिटी प्रिंटर्स प्रा ,.लि.फरीदाबाद यांचेकडून घेण्यात येतील. सदर सोडतींच्या तिकीटांची विक्री ही फक्त महाराष्ट्र राज्यातच करण्यात येईल . तसेच तिकीटांवर (For sale only in Maharashtra State) असा मजकूर छापण्यात यावा.

६. ", महाराष्ट्र गणेशलक्ष्मी भाग्यशाली ", "महाराष्ट्र गणेशलक्ष्मी शुभ", " महाराष्ट्र गणेशलक्ष्मी विजयी"," महाराष्ट्र गणेशलक्ष्मी गौरव","महाराष्ट्र गणेशलक्ष्मी धन", " महाराष्ट्र गणेशलक्ष्मी समृध्दी" व महाराष्ट्र गणेशलक्ष्मी वैभव" या साप्ताहिक सोडतींची वक्षिसरचना -

मालिका : १० (०० ते०९)
तिकिटांचे क्रमांक : ०००० ते ९९९९
सोडत दिनांक : माहे जुलै,२०२६ पासून
सोडतीची वेळ : सायं.५.०० वाजता.

प्रत्येक मालिकेत १०,००० तिकिटे
एकूण तिकिटे : १ लाख
तिकिटांची किंमत : रू.१०/-(GSTसहीत)

वक्षिसे	वक्षिसाची रक्कम रूपये	प्रत्येक मालिकेतील वक्षिसांची एकूण संख्या	सर्व मालिकांतील वक्षिसांची एकूण संख्या	सर्व मालिकांतील वक्षिसांची एकूण रक्कम रुपये
पहिले सामाईक वक्षिसे (पूर्ण क्रमांक)	१०,०००/-	--	१	१०,०००/-
दुसरे वक्षिस (पूर्ण क्रमांक) (१ क्रमांक) (सर्व मालिकांसाठी)	७,०००/-	१	१०	७०,०००/-
तिसरे वक्षिस (पूर्ण क्रमांक) (१ क्रमांक) (सर्व मालिकांसाठी)	५,०००/-	१	१०	५०,०००/-
